# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी **P.S.(ठाणे):** चिपळूण **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0166 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/06/2023 03:59 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/06/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/06/2023
**Time From (वेळेपासून):** 12:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/06/2023 **Time (वेळ):** 02:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/06/2023 02:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 7 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालय पिपंळी खु, पिपंळी खुर्द ,चिपळुण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** चिपळूण

**District(State) (जिल्हा(राज्य)):** रत्नागिरी(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.दिनेश दिलीप मेढेकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एपी मार्ट दुसरा मजला सती ,चिपळूण,चिपळूण ,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो कळकंवणे मधली वाडी ,चिपळूण,चिपळूण ,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8983065267

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अश्विन चंद्रकिशोर नंदगवळी | | | 1. प्लट नं 304,विजय विहार अपार, चिपळुण,चिपळूण ,रत्नागिरी,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

श्री. दिनेश दिलीप मेढेकर, वय. 37 वर्षे, सध्या रा. एपी मार्ट, दुसरा मजला, सती, ता. चिपळुण, जि. रत्नागिरी. मुळ रा.मु.पो.कळकंवणे मधली वाडी ता.चिपळूण, जि. रत्नागिरी मो. नं. 8983065267 फिर्याद लिहून देतो की,मी वरील ठिकाणी राहणार आहे. मी व माधवी कृष्णा तारये यांची मौजे पिपळीखुर्द या ठिकाणी सर्व्हे नंबर 3/29 एकुण क्षेत्र 0.10.00 हे आर अशी जमीन मिळकत असुन सदर जमीनी मध्ये मी स्वतः व माधवी कृष्णा तारये असे एकुण दोन कब्जेदार आहेत. सदर जमीन मिळकत ही बिनशेती जमीन असुन सदर जमीनीचे आम्ही दोन्ही कब्जेदार यांना दोन सारखे तुकडे म्हणजेच प्रत्येकी 0.05.00 हे आर असे तुकडे करावयाचे असल्याने मी मा. उपविभागीय अधिकारी साहेब चिपळुण यांचेकडे अर्ज सादर केला होता. सदर कामाच्या अनुशंगाने मी तलाठी सजा पिंपळीखुर्द श्री.नंदगवळी यांची भेट घेतली असता त्यांनी उपविभागीय कार्यालय चिपळुण येथुन आदेश प्राप्त करुन घेण्याकरीता व त्याप्रमाणे स्वतंत्र सातबारा उतारा देणेकरीता माझ्याकडे उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांचेकरीता 40,000/-रुपये व स्वतःकरीता 20,000/-रुपये असे एकुण 60,000/-रुपये रक्कमेची मागणी केली होती. तलाठी नंदगवळी यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची खात्री झाल्याने व त्यांना मला लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. त्यामुळे मी दिनांक 30/05/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय रत्नागिरी येथे जावुन पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांची भेट घेतली, व लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे त्यांना समक्ष सांगितले होते. त्यानुसार दिनांक 01/06/2023 रोजी सकाळी 11.00 वाजताचे सुमारास मौजे सती येथील निर्जनस्थळी पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांची भेट घेतली. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी माझी पंच व लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील कर्मचारी यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगुन, वरील हकिकतीप्रमाणे स्वःहस्तक्षरातील माझा तक्रारी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांचे समक्ष हजर केली. पोलीस निरीक्षक श्री. ताटे व पंचांनी माझा तक्रारी अर्ज वाचुन त्यावर तसेच त्यासोबत दिलेल्या कागदापत्रावर सहया केल्या. तक्रारी अर्ज व त्यासोबतचे कागदपत्र पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी ताब्यात घेतले.त्यानंतर मी तलाठी नंदगवळी हे तलाठी कार्यालय पिंपळी खुर्द येथे भेटतील असे पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांना सांगितले. त्यामुळे तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मला पंचासह तलाठी कार्यालय पिंपळी खुर्द येथे पाठवणार असल्याचे व भेटीदरम्यान माझे व तलाठी नंदगवळी यांचेतील संभाषण डिजिटल व्हाईस रेकर्डरव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री.ताटे यांनी मला व पंचाना सांगितले. पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकर्डर व नवीन सीलबंद मेमरी कार्ड हजर केले. त्यांनी डिजिटल व्हाईस रेकर्डरमध्ये मेमरी कार्ड घालुन त्यामध्ये अगोदरचे काहीही संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले नाही याबाबत पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हाईस रेकर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी मला व पंच नं. 1 घुडे यांना तलाठी नंदगवळी यांची भेट झाल्यानंतर सती येथे

निर्जनस्थळी परत येण्याच्या सुचना दिल्या. तसेच त्यांनी डिजिटल व्हाईस रेकर्डर चालू करून माझे षर्टच्या आत बनियनमध्ये लपविला. ती वेळ 12.24 वाजताची होती. माझे कडील युनिकर्न मोटार सायकल नंबर एमएच/08/अ◌ॅडब्लु/9346 या वाहनाने मी, पंच नं. 1 घुडे यांचेसह पडताळणी कामी तलाठी नंदगवळी यांची भेट घेण्याकरीता पिंपळी खुर्द ग्रामपंचायत या ठिकाणी पोहचलो. मी ग्रामपंचायत कार्यालय जवळ वाहन पार्क केले. मी व पंच घुडे गाडीवरुन खाली उतरलो. त्यावेळी तलाठी नंदगवळी तलाठी कार्यालयाकडे जाणारे जिन्यातुन खाली आले. त्यावेळी मी जावुन तलाठी यांना भेटुन भाऊ नमस्कार... मेढेकर असे बोललो. माझेत व तलाठी नंदगवळी यांचेत कामासंबंधात बोलणे चालु होते. त्यावेळी मी याचं मला काय ते सांगा असे विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी सहया केल्यात ना.. असे विचारुन प्रांत ऑफिसच चाळीस बोलले तिथे... असे सांगितले. त्यावेळी मी चाळीस हजार मागतात? असे विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी लगेच आदेश करुन देतो बोलले... आदेश केला की, मी लगेच इथं करुन टाकतो... आणि सर्कल पाच मागत होते.. नंतर मला काय देवु पण नका तुम्ही... असे त्यांनी सांगितले. त्यावेळी मी चाळीस हजार खाली आणि सर्कलला पाच लागतील का? असे विचारुन याच कसं काय करायचं असे विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी एवढे जर पोच झाले ना तर आदेश फायनल हातातच भेटेल.. असे सांगितले. त्यावर मी हया अमाऊंटच कसं काय करायचं असे विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी अमाऊंट एकदम भेटली ना तर डायरेक्ट काढतील आदेश असे सांगितले. त्यावर मी एवढे एकदम नाय होणार थोडेफार आता पुढे करतो असे सांगितले असता तलाठी नंदगवळी यांनी थोडंफार म्हणजे किती करणार ज्या दिवषी आदेश हातात भेटेल त्याच दिवषी तुम्हाला सातबारा सेपरेट करुन मोकळं करुन देतो असे सांगितले. त्यावेळी मी दहा एक हजार मी जमवुन पुढे करीन अजुन थोडे दिवस काय दया असे सांगितले असता तलाठी नंदगवळी यांनी मी प्रांत ऑफिसला बोलुन बघतो असे सांगितले. त्यावेळी मी काय तरी बघा एडजेस्ट काय होतय काय चाळीस हजार रुपये प्रांत मागतायेत म्हणजे भरपुर झाले असे सांगितले. त्यावेळी तलाठी नंदगवळी यांनी मागतात तिथे त्यांना काय पडलेली नाय त्यांना फक्त पैषाषी मतलब असे सांगितले. त्यावर मी ठिक आहे पण मला काय तरी वेळ दया असे सांगितले असता तलाठी नंदगवळी यांनी बघु मेव्हणाला बोला की, पुन्हाः व्यवहार झाला की हे करुन टाका असे सांगितले. त्यावेळी मी हो.. ते पण चाळीस हजार रुपये पुढे करायला दयायला त्यांना... पाच एक दहा हजार रुपये मी काय तरी करेन असे सांगितले. त्यावर तलाठी नंदगवळी यांनी मी संध्याकाळी बोलतो प्रांत ऑफिसला काय एडजेस्ट झालं ना तर मी तुम्हाला फोन करतो असे सांगितले. त्यांनतर तलाठी नंदगवळी तेथुन निघुन गेले. मी व पंच घुडे असे माझे मोटारसायकलने पडताळणी पथक थांबुन असलेल्या सती येथील निर्जनस्थळी परत आलो. त्यावेळी पोनि ताटे यांनी माझे◌ जवळील डिजीटल व्हाईस रेकर्डर बंद करून ताब्यात घेतला. ती वेळ 12.42 वा. होती. पोलीस निरीक्षक श्री ताटे यांनी मला घडलेली हकीकत विचारली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि ताटे यांनी शासकीय वाहनात डिजीटल व्हाईस रेकर्डर चालू करुन, स्पिकर ऑन केला. त्यावेळी मी, पंच, पोलीस निरीक्षक श्री. ताटे व पडताळणी पथकाने त्यातील संभाशण ऐकले. त्यावेळी मी माझा व तलाठी नंदगवळी यांचा आवाज ओळखला. सदर पडताळणीमध्ये तलाठी नंदगवळी यांनी माझे व माझे सहहिस्सेदार यांचे नावे असलेल्या बिनशेती जमीनीचे दोन समान हिस्से करुन उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण यांचेकडुन बिनशेती विभाजनाचे आदेश प्राप्त करुन घेण्याकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण येथील कर्मचारी यांचेकरीता 40,000/-रुपये व त्याप्रमाणे वेगळा सातबारा देण्याकरीता मंडळ अधिकारी यांचेसाठी 5,000/-रुपये असे एकुण 45,000/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे समक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाशणामध्ये आढळुन आलेले होते. तसेच तलाठी नंदगवळी यांनी प्रांत कार्यालयात बोलुन सदरची रक्कम कमी करतात का ते बघतो व मला फोन करतो असे सांगितल्याने तलाठी नंदगवळी यांच्या फोनची वाट बघणार असल्याचे पोनि ताटे यांनी मला, पंचाना व पडताळणी पथकास सांगितले. त्यानुसार तलाठी नंदगवळी यांचा फोन न आल्याने तलाठी नंदगवळी यांना फोन करुन माहीती घेण्याबाबत पोनि ताटे यांनी मला सांगितले. तसेच आमचेत फोनवर होणारे संभाशण डिजीटल व्हाईस रेकर्डर द्वारे मेमरीकार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे पोनि ताटे यांनी सांगितले. त्याप्रमाणे मी माझे मोबाईलवरुन तलाठी नंदगवळी यांना कल केला असता फोनची रिंग वाजुन फोन रिसीव्ह न केल्याने कल कट केला. सदरचा कल रिसीव्ह न केल्याने डिजीटल व्हाईस रेकर्डर द्वारे मेमरीकार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेला नाही. तलाठी नंदगवळी यांचेषी फोनवर संपर्क न झाल्याने तसेच पैषाची जुळवा जुळव करणेकरीता वेळ मागितला असल्याने सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करुन पुढील सापळा कारवाई माझेकडे रक्कम उपलब्ध झाल्यानंतर माझेशी संपर्कात राहुन करण्यात येणार असल्याचे पोनि ताटे यांनी मला, पंच व पडताळणी पथकास सांगितले.माझेकडे रक्कम उपलब्ध झालेबाबत मी पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांना कळविले होते. त्यानुसार दिनांक 22/06/2023 रोजी मौजे सती या ठिकाणी निर्जनस्थळी मी पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांची भेट घेतली असता, पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी तलाठी कार्यालय पिंपळी खुर्द येथे पाठवुन पुढील सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे मला, पंच व अ◌ॅसीबी स्टाफ यांना सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी सापळा पुर्व कार्यवाही येथे पुर्ण करुन, सापळा कारवाई पुढे चालु करण्यात येईल असे सांगितले. पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांचे सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये 45,000/- (रुपये पंचेचाळीस हजार) (500/- रुपये दराच्या 90 भारतीय चलनी नोटा) हजर केली. पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांच्या सुचनेवरून पंच नं. 1 घुडे यांनी माझी अंगझडती घेतली. माझे अंगझडतीत मिळुन आलेल्या चीजजवस्तु व रोख रक्कम मला परत करण्यात आल्या.पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी शासकीय वाहनात मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या वस्तूवर अन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर षासकीय वाहनामध्ये काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविल्या त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या. पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांच्या सूचनेवरून पोहवा/कोळेकर यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व त्या नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविल्या असता नोटांवर अगर त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर अन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर शासकीय वाहनामध्ये काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधार करून पोहवा/कोळेकर यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोहवा/कोळेकर यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर उजेड करण्यात आला. पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांच्या सूचनेवरून पोहवा/कोळेकर यांनी त्या नोटांची घडी करुन माझ्या पन्टच्या डाव्या बाजुच्या खिषात ठेवली. त्यावेळी मला पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी सूचना दिली की, लोकसेवक नंदगवळी यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तो पर्यंत मी सदर नोटांना हात लावू नये असे सांगितले. सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ताटे यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी तलाठी नंदगवळी यांना लाच रक्कम देण्यासाठी भेट घेईन त्यावेळी आमचेतील होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे निवेदन डिजिटल व्हाईस रेकर्डम मध्ये ध्वनीमुद्रीत केले. सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोनि ताटे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आत बनियन मध्ये लपविला. ती वेळ 12.07 वाजताची

होती. त्यानंतर मी व पंच नंबर 1 घुडे असे मोटारसायकलने तलाठी नंदगवळी यांची भेट घेण्यासाठी पिंपळी खुर्द ग्रामपंचायत येथे पोहोचलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच नं. 2 जायभाये असे शासकीय वाहनाने सदर ठिकाणी आले.

मी ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोरील मोकळ्या जागेत गाडी पार्क करुन, जिन्याने पहिल्या मजल्यावरील तलाठी कार्यालयात गेलो. त्यावेळी पंच नं. 1 घुडे हे माझे मागोमाग येवुन तलाठी कार्यालयाच्या बाहेर दरवाजाजवळ थांबुन होते. त्यावेळी मी तुम्ही फोन करतो बोललात असे तलाठी नंदगवळी यांना विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी तुमचा फोन यायला नको का मला असे विचारले असता मी त्यांना फोन केला होता, तुम्ही तिकडे जावुन कमी वगैरे केलं ते काय माहीती नाही जरा जमवाजमव पण केली तुम्ही सांगितलेला आकडा.. असे सांगितले. त्यावेळी तलाठी नंदगवळी यांनी माझी मिळवणुक सोडुन देतो, पाच हजार मी, त्या लोकांचे तेवढे दया.. असे सांगितले. त्यावर मी ऑर्डर बद्दल विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी पवार साहेबांची बदली झाली आहे. लिगडे साहेबांशी बोलुन घेतो आपलं प्रकरण रेडी आहे असे सांगितले. त्यावेळी मी पेमेंट देवुन ठेवु का असे विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी प्रकरण मांडतो नंतर दया.. भेटल्यानंतर दया असे सांगितले असता मी नको परत घरी असले की, पैसे खर्च होवुन जातात असे सांगितले. त्यावर तलाठी नंदगवळी यांनी संध्याकाळी करुया विषय असे बोलले असता. मी पेमेंटच काय करु मग, देवुन ठेवु का? असे विचारले असता तलाठी नंदगवळी यांनी संध्याकाळी दया असे सांगितले. त्यावर मी संध्याकाळी कुठे येवु असे विचारुन संध्याकाळी डॉक्टरकडे जायचे असल्याचे सांगितले. त्यावर तलाठी नंदगवळी यांनी मी दवाखान्यात येवु का? असे विचारुन पेमेंट आणलेलं आहे का? असे विचारले असता मी आणलय बरोबर आणुनच ठेवलेत असे सांगितले. त्यावर तलाठी नंदगवळी यांनी एकुण आहेत किती असे विचारुन आहेत ते दया ना असे सांगितले. त्यावर मी माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशातील लाच रक्कम डाव्या हाताने काढुन तलाठी नंदगवळी यांचे समोर धरली व हे मोजुन घ्या असे सांगितले. त्यावेळी तलाठी नंदगवळी यांनी लाच रक्कम आपल्या उजव्या हाताने स्विकारुन हे किती आहेत असे विचारले असता मी चेक करुन घ्या सगळे तुम्ही सांगितलेल्या आकडयाचे पंचेचाळीस हजार रुपये सगळे.. असे सांगितले. त्यावेळी तलाठी नंदगवळी यांनी लाच रक्कम टेबलच्या ड्रॉवर मध्ये ठेवली व हयातले तुमचे जेवढे वाचतील तेवढे परत देतो असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने मी कार्यालयातुन बाहेर पडुन जिन्याने खाली चालत आलो व सापळा पथकास तलाठी नंदगवळी यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा म्हणुन माझा उजवा हात माझे डोक्यावरुन वारंवार फिरविला त्यावेळी पोनि ताटे यांनी ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाजुला येवुन माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला ती वेळ 12.23 वाजताची होती. त्यानंतर पोनि ताटे, मी, पंच व सापळा पथकासह पिंपळी खुर्द, ग्रामपंचायत कार्यालयाचे वरच्या मजल्यावर असणा-या तलाठीकार्यालयामध्ये गेलो. पोनि श्री ताटे यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली याबाबत विचारणा केली असता, मी तलाठी कार्यालयातील तलाठी नंदगवळी यांचेकडे अंगुलीनिर्देश केला व सदरची लाच रक्कम 45,000/- रुपये मी, माझे पॅन्टच्या डाव्या खिषातुन डाव्या हाताने काढून तलाठी नंदगवळी यांचेसमोर धरली असता त्यांनी ती लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचे टेबलच्या डाव्या बाजुच्या ड्रॉवर मध्ये ठेवली असल्याचे सांगितले. लागलीच पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी तलाठी नंदगवळी यांचा उजवा हात व पोशि गावकर यांनी डावा हात पकडुन त्यांना अटकावुन ठेवले. पोनि ताटे यांचे सुचनेवरुन मी माझे हात कषासही लागणार नाही अशा स्थितीत तलाठी कार्यालयाचे बाहेर थांबुन राहिलो.काही वेळानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी मला तलाठी कार्यालयात बोलाविले. तलाठी कार्यालयाचे दारे खिडक्या बंद करुन काळ्या रंगाच्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करुन माझ्या हातांची व पॅन्टच्या डाव्या खिशाची अल्ट्राव्हा◌ॅयोलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझ्या डाव्या हाताच्या अंगठयासह सर्व बोटांचे पेरांना व पॅन्टच्या डाव्या बाजुचे खिषाचे वरील कडेला व आतील बाजुस अ◌ॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच नं. 1 घुडे यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळापुर्व कारवाईचे पुर्वी होत्या तशा वस्तु मिळुन आल्या. पोनि ताटे यांचे सुचनेवरून मी माझे हात धुतले.

त्यानंतर तलाठी कार्यालय पिंपळीखुर्द येथे पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने पोलीस निरीक्षक श्री. ताटे, पंच, सापळा पथक व तलाठी नंदगवळी असे शासकीय वाहनाने व मी माझे दुचाकी वाहनाने शासकीय विश्रामगृह चिपळुण येथे आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे यांनी शासकीय विश्रामगृह चिपळुण येथे दोन कक्ष उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ताटे यांनी मला घडलेली हकिकत विचारली असता मी त्यांना घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक ताटे यांनी माझे व तलाठी नंदगवळी यांचेषी समक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाषण ऐकवुन ते स्क्रिप्टप्रमाणे सारखेच असल्याची खात्री करून दिली. त्यावेळी मी, माझा व तलाठी नंदगवळी यांचा आवाज ओळखला. त्याप्रमाणे संभाषणात नावे नमुद करण्यात आली.

तरी माझ्या व माझे सहहिस्सेदार यांचे नावे एकित्रत असलेल्या बिनशेती जमीनीचे दोन समान हिस्से करुन उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण यांचेकडुन बिनशेती विभाजनाचे आदेश प्राप्त करुन घेण्याकरीता अश्विन चंद्रकिशोर नंदगवळी, तलाठी सजा नांदिवसे, अतिरिक्त पदभार पिंपळीखुर्द यांनी दिनांक 01/06/2023 रोजी 12.24 ते 12.42 वाजताचे दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय पिंपळी खुर्द येथील आवारात उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण येथील कर्मचारी यांचेकरीता 40,000/-रुपये व वेगळा सातबारा देण्याकरीता मंडळ अधिकारी यांचेसाठी 5,000/-रुपये असे एकुण 45,000/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर दिनांक 22/06/2023 रोजी 12.23 वाजण्याचे सुमारास मागणी केलेली लाच रक्कम 45,000/- रुपये तलाठी नंदगवळी यांनी तलाठी कार्यालय पिंपळी खुर्द येथे पंचासमक्ष स्वीकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत लॅपटॉपवर टंकलिखित केलेला असून तो मी स्वतः वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे खरा व बरोबर आहे.

समक्ष

(प्रविण ताटे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): Ratnadip Rajendra Salokhe
**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): DGPRRSM8906 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Ravindra Pitambar Shinde
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): BPMH75186

पोलीस स्टेशन ऑफीसर
चिपळूण पोलीस ठाणे

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)